पो.स्टे.चंद्रपूर शहर जि.चंद्रपूर

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** चंद्रपुर **P.S.(ठाणे):** चंद्रपूर शहर
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0285 **Year (वर्ष):** 2026
**Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):**22/02/2026 05:48

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** दरमियानी दिन **Date From (दिंनाक पासून):** 20/02/2026
**Time Period (कालावधी):** **Date To ( दिंनाक पर्यंत):** 21/02/2026
**Time From (वेळेपासून):** 12:00 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 13:41 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिंनाक ):** 22/02/2026 **Time (वेळ):** 04:30 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 012
**Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 22/02/2026 05:48 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 3 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** भिवापुर वार्ड स्क्रब दुकानात,चंद्रपुर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then**
(या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): सचिन एस. धर्मेजवार

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1981

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| **S.No.** (अ.क्र.) | **ID Type** (ओळखपत्राचा प्रकार) | **ID Number** (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Address Type** (पत्याचा प्रकार) | **Address** (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबधक विभाग,चंद्रपूर,चंद्रपूर शहर,चंद्रपुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबधक विभाग,चंद्रपूर,चंद्रपूर शहर,चंद्रपुर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9623055655

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Name** (नाव) | **Alias** (उर्फनाव) | **Relative's Name** (नातेवाईकाचे नाव) | **Present Address** (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | शुभम नंदकिशोर वरघट | | | 1. गाडगेनगर ,डागा ले आऊट मुर्तीजापुर ,,अकोला,मुर्तीजापूर, अकोला,महाराष्ट्र,भारत |
| 2 | दिनेश दिलीप समद्दर | | | 1. भिवापुर वार्ड 14,बंगाली प्रांतीक कॉलनी,चंद्रपुर,चंद्रपूर शहर, चंद्रपुर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक सामान | ध्वनी उपकरणे | 3 Sandisk micro SDHCTM Card | 0.00 |
| 2 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक सामान | मोबाईल फोन | आरोपी क्र.1 याचा ओप्पो कंपनीचामोबाईल फोन | 30,000.00 |
| 3 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक सामान | मोबाईल फोन | आरोपी क्र. 2 याचा विवो कंपनीचा मोबाईल फोन | 5,000.00 |
| 4 | वाहने आणि इतर | मोपेड/पॅडलयुक्त मोटर साइकल | आरोपी क्र. 2 यांचे ताब्यातुन वेस्पा कंपनीचा मोपेड MH 40 TC031 | 50,000.00 |
| 5 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500/ रु च्या 260 नोटा | 130,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

215,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| **S.No.** (अ.क्र.) | **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):
फिंयाद

पोलीस स्टेशन, चंद्रपूर शहर जि. चंद्रपूर
दिनाक 22/02/2026

नांव- सचिन एस. धर्मेजवार, वय 45 वर्षे, व्यवसाय नोकरी, पोलीस निरीक्षक, नेमणुक, लाचलुचपत प्रतिबधक विभाग, चंद्रपूर, मो.क्र. 9623055655
पोलीस स्टेशन चंद्रपूर शहर, जि. चंद्रपूर येथे हजर होउन तक्रार लिहुन देतो की, मी लाचलुचपत प्रतिबधक विभाग चंद्रपूर येथे कार्यरत आहे.

दिनाक 20/2/2026 रोजी लाचलुचपत प्रतिबधक विभाग कार्यालय चंद्रपूर येथे हजर असतांना वेळ 12/00 वा. दरम्यान एक इसम कार्यालयात हजर येवून लाच मागणी संबधाने तक्रार द्यावयाची आहे असे सांगितल्याने त्यांना त्यांचे नाव पत्ता व तक्रारीसंबधाने विचारणा केली असता तक्रारदाराने आपले नाव अब्दुल रशीद अब्दुल हमीद, वय 52 वर्षे, धंदा भंगार स्क्रब काटा, रा. राजस्थान फॅक्टरी के पास, एकोरी वार्ड क्र. 10 चंद्रपूर ता.जि. चंद्रपूर असे सांगून त्यांना सुचीत केलेवरून त्यांनी हस्तलिखीत तक्रार सादर केली.

सदर तक्रारीवरून लाच मागणीची पडताळणी करून पुढील लाचेचा सापळा कार्यवाही आयोजीत करण्यासाठी आमचे कार्यालयातील पोशि/प्रदीप ताडाम यांचे हस्ते मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद चंद्रपूर यांना पत्र देवून दोन शासकीय पंच नामे श्री. नितीन विठ्ठलराव सहस्त्रबुध्दे, वय 53 वर्षे पद-लेखा अधिकारी, (शालेय पोषण आहार, शिक्षण विभाग), श्री. महेश नेतराम वट्टी वय 30 वर्षे पद- कृषी अधिकारी (म.गांधी, राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना) जिल्हा परिषद चंद्रपूर यांना उपलब्ध करून घेतले.

त्यांनतर दोन्ही पंचाना तक्रारदार अब्दुल रशीद अब्दुल हमीद, यांनी लोकसेवकाविरूध्द लाच मागणी संबधाने तक्रार दिलेली असून तक्रारीनुसार नमूद लोकसेवकाने तक्रारदाराकडे लाचेची मागणी केल्यास व लाच मागणीबाबत योग्य पडताळणी झाल्यास त्यांचेविरूध्द लाचेचा सापळा आयोजीत करून कायदेशीर कार्यवाही करावयाची आहे असे सांगून सदर कार्यवाहीत पंच म्हणून काम करण्याची संमती विचारली असता दोन्ही पंचानी पंच म्हणुन काम करण्याची संमती दर्शविल्याने त्यांचे संमतीपत्र घेण्यात आले. त्यावरून पंच क्र. 1) श्री. महेश नेतराम

वट्टी, कृषी अधिकारी व पंच क्र. 2) श्री. नितीन विठ्ठलराव सहस्त्रबुध्दे, लेखा अधिकारी, म्हणुन हे काम पाहणार असल्याचे ठरविण्यात आले.

सापळा पार्टीतील सदस्य पोहवा विजेंद्र वाढई, पोहवा रविंकात इंगळे, पोशि अमोल सिडाम, पोशि प्रदीप ताडाम, पोशि राकेश जांभुळकर, पोशि राजेंद्र चौधरी, मपोशि मेघा मोहुर्ले, चालक पोशि सतिश सिडाम, सर्व ला.प्र. वि. चंद्रपूर व चालक पोशि संदीप कौरासे मो.प.वि.चंद्रपूर तसेच तक्रारदार यांचा नमूद दोन्ही पंचांना परिचय करून देवून तक्रारदार अब्दुल रशीद अब्दुल हमीद यांचीच लोकसेवकाविरूध्द तक्रार असल्याचे सांगण्यात आले.

त्यांनतर आम्ही, तक्रारदार अब्दुल रशीद अब्दुल हमीद यांनी स्वहस्ताक्षरात लिहून दिलेली तक्रार दोन्ही पंचांना वाचावयास दिली ती तक्रार दोन्ही पंचांनी वाचली. त्यांनतर आमचे सुचनेप्रमाणे दोन्ही पंचांनी तक्रारदार यांना त्यांचे तक्रारीसंबधी तोंडी विचारपूस केली.

त्यानंतर आम्ही पंचाना तक्रारदार यांनी लिहुन दिलेली तक्रार दाखविली असता ती, खालीलप्रमाणे, '' नाव : श्री. अब्दुल रशीद अब्दुल हमीद शेख, वय 52 वर्षे, धंदा- भंगार स्क्रब काटा, रा. राजस्थान फॅक्टरी के पास, एकोरी वार्ड क्र. 10 चंद्रपूर ता.जि. चंद्रपूर मो.क्र. 9021913361,

सविनय विंनती याप्रमाणे आहे की, मी माझे परिवारासह वरिल पत्यावर राहत असुन भिवापूर वार्ड, सुपर मार्केट जवळ, चंद्रपूर येथे माझे भंगार (स्क्रब) चे दुकाण आहे, ते मी चालवितो. मी भंगाराचे काम करीत असल्याने वार्डात व कामाचे ठिकाणी मला 'रशीद काटेवाला' या नावाने ओळखतात.

माझे केमेकर वाडी, भंगाराम वार्ड चंद्रपूर येथे सुध्दा भंगाराचे गोदाम असून त्याठिकाणी भंगाराचा माल जास्त असून दुकाणाची जागा अपुरी पडत असल्याने सन 2020 मध्ये माझे भंगार दुकाणासमोरील नदीकाठचा 1200 स्के. फुटाचे चार रूमचे बांधकाम असलेले कच्चे घर श्री शेख सलीम शेख नूर यांचेकडून नोटरी करून पत्नी सौ. नाजीमा अब्दुल रशीद शेख हिचा नावे खरेदी केले होते. त्यांनतर मी सदर घर तोडून त्याठिकाणी कंम्पाउड वॉल करून टिनाचे शेड टाकून माझा भंगारचा माल त्याठिकाणी ठेवत आहे.

शेख सलीम शेख नूर यांचेकडून माझे पत्नीच्या नावे खरेदी केलेल्या जागेच्या मागील बाजुस श्री. प्रवेश सुधाकर गर्गेलवार यांचे एकुण 7 प्लॉट असुन ज्याचे एकुण क्षेत्रफळ 5500 चौ.फुट एवढे आहे. सदर प्लॉटवर जाण्यास रस्ता नसल्याने श्री. प्रवेश गर्गेलवार यांनी माझी तक्रार महानगरपालीका चंद्रपूर यांचेकडे केली होती. त्यावरून दिंनाक 10/2/2026 रोजी महानगरपालीका चंद्रपूर यांचेकडून शेख सलीम शेख नूर यांचेकडून नोटरीव्दारे खरेदी केलेल्या जागेचे कागदपत्रे सादर करणेबाबत नोटीस प्राप्त झाले.

त्यानंतर दिनाक 12/2/2026 रोजी संध्याकाळी 05/00 वा. दरम्यान सदर नोटीसामध्ये नमूद तक्रारकर्ता श्री. प्रवेश गर्गेलवार यांचेकडे जावून विचारणा केली असता त्याने मला म्हटले की 'तुझे भंगाराचे दुकाणाची जागा व त्याचेमागील प्लॉट माझे आहे, त्यामुळे मी महानगरपालीकाकडे तक्रार दिली आहे.' तेव्हा मी त्यांना सदर तक्रार परत घेण्याबाबत विंनती केली असता त्यांनी मला माझे भंगाराचे दुकाण सुध्दा त्यांचेच जागेवर आहे व माझे दुकाणामुळे त्यांचे प्लॉटवर जाण्यासाठी रस्ता नसल्याने मला संपुर्ण 7 प्लॉट खरेदी करण्यास तयार असल्यास ते तक्रार परत घेईल असे सांगितले. मला माझे व्यवसायाकरीता जागेची आवश्यकता असल्याने मी श्री. प्रवेश गर्गेलवार यांचेकडून त्यांचे नावावर असलेले सातही प्लॉट खरेदी करण्याबाबत दिंनाक 12/2/2026 रोजी 100 रूपयाचे स्टॅम्प पेपरवर विसारपत्र केले आहे.

दिंनाक 11/02/2026 रोजी रात्रौ 10 वा. दरम्यान 8855092914 या मोबाईल क्रमांकावरून फोन आला, त्यांनी मला ''मै दिनेश बोल रहा हु, तुमे जो नोटीस मिली है, उसके बारे मे मुझे बोलना है'' असे म्हणुन ''महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांशी तुमच बोलण करून देतो'' असे म्हणाला. त्यावर त्यांना ''ठिक है'' असे म्हणुन मी फोन ठेवून दिला.

त्यानंतर दिनाक 14/02/2026 रोजी मी माझे भंगाराचे दुकाणात असतांना दिनेश यांचे दोन-तीनदा माझे मोबाईलवर फोन आले, त्याने मला सायंकाळी त्यांचे छोटा बंगाली कॅम्प, भिवापूर वार्ड चंद्रपूर येथील घरी भेटण्यास सांगीतले. त्यावरून मी सायंकाळी 7/30 वा. दरम्यान त्यांनी सांगितल्याप्रमाणे त्यांचे घरी जावून श्री. दिनेश व त्यानंतर त्या ठिकाणी आलेल्या श्री शुभम देवतळे यांची भेट घेतली, तेव्हा अभियंता श्री शुभम देवतळे यांनी मला म्हणाले की, ''इरई नदी काठच्या अनाधिकृत जागेवर तुम्ही अवैधपणे टिनाचे शेड व वॉल कम्पाऊट बांधकाम केले आहे, ते तोडावे लागेल.'' तेव्हा मी त्यांना त्या जागेवर असलेला भंगार दुकाण तोडू नये म्हणून विंनती केली असता अभियंता श्री. शुभम देवतळे यांनी मला '' तुझे भंगाराचे दुकाण तोडणार नाही, परतु त्या कामाकरीता मला तीन लाख रूपये दयावे लागतील'' असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना ''मी पोटापाण्यासाठी भंगाराचा व्यवसाय करतो, तेवढे पैसे माझेकडे नाही.'' असे म्हणालो. तर अभियंता श्री. शुभम देवतळे यांनी मला म्हटले की, ''शेवटचे तुला 2,30,000 /- रूपये दयावे लागतील अन्यथा तुझे भंगारचे दुकाण पाडण्यात येईल.'' तेव्हा मी घाबरून जावून बघतो असे

म्हणून तेथून निघून गेलो. त्यानंतर श्री. शुभम देवतळे, अभियंता महानगरपालीका चंद्रपूर यांना पैसे नाही दिले तर ते माझे भंगाराचे दुकाण पाडतील, या भितीने, मी लाचलुचपत प्रतिबधक कार्यालयात तक्रार देण्यास न येता दिनाक 17/2/2026 रोजी सेन्ट्रल बँक शाखा गंजवार्ड चंद्रपूर येथून माझे खात्यात जमा असलेले 1 लाख रू काढून आणले व त्याचदिवशी दुपारी 11/45 वा. दरम्यान दुकाणात मी एकटाच हजर असतांना श्री. दिनेश माझे भंगार दुकाणात आल्यावर श्री. शुभम देवतळे, अभियंता महानगरपालीका चंद्रपूर यांनी मागणी केलेल्या 2,30,000/- रूपयांपैकी 1 लाख रूपये श्री. दिनेश यांचेकडे नाईलाजास्तव दिले. त्यावेळी श्री. दिनेश याने उर्वरित 1,30,000/- रूपये लवकर जमवून त्याचे मोबाईल क्र. 8855092914 वर फोन करण्यास सांगितले आहे.
मला श्री. शुभम देवतळे, अभियंता, महानगरपालीका चंद्रपूर यांना 1,30,000/- रूपये लाच रक्कम देण्याची माझी ईच्छा नसल्याने मी आज दिनाक 20/02/2026 रोजी दुपारी 12/00 वा. लाचलुचपत प्रतिंबधक विभाग चंद्रपुर येथे प्रत्यक्ष हजर येवुन आपणास भेटुन वरिल प्रमाणे हकीकत सांगून लाच मागणी बाबत तक्रार असल्याचे सांगितले असता आपण मला लेखी तक्रार देण्यास सांगितले. त्यावरून मी आपणास माझे हस्ताक्षरात गैरअर्जदार श्री. शुभम देवतळे, अभियंता, महानगरपालीका चंद्रपूर व श्री. दिनेश यांचेविरूध्द लेखी तक्रार देत आहे.मला हिंदी व मराठी या दोन्ही भाषा बोलता व वाचता येतात.
माझा गैरअर्जदार श्री. शुभम देवतळे, अभियंता महानगरपालीका चंद्रपूर व श्री. दिनेश यांचेशी माझा कोणताही आर्थिक व उसनवारी व्यवहार नसुन त्यांचेशी कोणतेही वैमनस्य नाही. माझे व्यवसायातील बचतीतील 1,30,000/- रू. लाच रक्कम वापरण्याकरीता यावेळी आपल्याकडे देत आहे. गैरअर्जदार श्री. शुभम देवतळे, अभियंता महानगरपालीका चंद्रपूर व श्री. दिनेश यांनी महानगरपालीकेतील नोटीसमध्ये नमूद माझे भंगाराम वार्ड, चंद्रपूर येथील इरई नदीकाठी असलेले भंगार दुकाणाचे बांधकाम अनाधिकृत व अवैध असल्याचे सांगून ते बांधकाम न तोडण्याचे कामाकरीता 2,30,000/- रू. मागणी करून यापुर्वी 1,00,000/- रूपये स्विकारले व उर्वरीत 1,30,000/-रू. लाचेची मागणी करीत असल्याने त्यांचेविरूध्द कायदेशीर कारवाई होण्याकरीता लेखी तक्रार देत आहे.''
अशाप्रकारे तक्रारदार यांनी दिलेली तक्रार व त्यांनी तक्रारीसंबधी तोंडी कथन केलेला मजकूर सारखाच असल्याची दोन्ही पंचांची खात्री झाल्यानंतर दोन्ही पंचानी व आम्ही तक्रारीवर सही केली. तसेच तक्रारदारानी महानगरपालीकेतर्फे त्यांना देण्यात आलेले नोटीस आमचेकडे दिल्याने त्याची छायान्कीत प्रत काढून आम्ही पंचानी व तक्रारदारानी सहया केल्यावर ती कागदपत्रात समाविष्ट केली. त्यांनतर तक्रारदार यांनी लाचेत वापरण्यात येणारे 1,30,000/-रूपयांचे नोटांचे क्रमांक संगणकावर टंकलीखीत करून त्यांची प्रिंट काढुन त्यावर आम्ही, तक्रारदार व दोन्ही पंचानी सहया केल्या. वरील नोटा व नोटांचे क्रमांक नमुद असलेली प्रत आम्ही आमच्या ताब्यात घेतल्या. त्यानंतर आम्ही, तक्रारदार व दोन्ही पंचाना लाचेच्या सापळा कार्यवाही करीता उपयोगात येणाऱ्या अँथ्रॉसीन पावडर व अल्ट्राव्हॉयलेट दिव्याचा उपयोग व त्याचे वैशिष्टे समजावून सांगितले की, अँथ्रॉसीन पावडर हे अंधारात अल्ट्राव्हायलेट दिव्याचे प्रकाशात तपासल्यास पावडर लागलेल्या ठिकाणी निळसर रंगाची चकाकी दिसून येते. साध्या प्रकाशात तशी चकाकी दिसून येत नाही. अँथ्रॉसीन पावडर ही लाच म्हणून द्यावयाच्या नोटांना लावली जाते. त्या नोटा जो कोणी हाताळेल त्याचे हातास नोटावरील काही पावडर चिपकते. तसेच त्या नोटा ज्या ठिकाणी ठेवल्या जातात त्या ठिकाणी ही पावडर चिपकते. सदर ठिकाणी व नोटा हाताळलेल्या व्यक्तीचे हात अंधारात अल्ट्राव्हायलेट दिव्याचे प्रकाशात तपासल्यास अँथ्रॉसीन पावडर लागलेल्या ठिकाणी निळसर रंगाची चकाकी दिसून येते. त्यानंतर पोशि/प्रदीप ताडाम यांना प्रात्याक्षिक करून दाखविण्यास सांगितले. त्याप्रमाणे पोशि/प्रदीप ताडाम यांनी कार्यालयातील कपाटातुन एक सिंलबद लिफापा बाहेर काढला. दोन्ही पंचांनी सदर लिफापा सिंलबद असल्याची खात्री केल्यावर पोशि/प्रदीप ताडाम यांनी लिफापा फाडून त्यामधुन अँथ्रॉसीन पावडर लेबल असलेली एक प्लास्टिक शिशी बाहेर काढुन तक्रारदार व पंचाना दाखविली. दोन्ही पंचासमक्ष त्या शिशीचे झाकण उघडून त्यामधील पावडर पोशि/प्रदीप ताडाम यांनी आपल्या हाताच्या बोटास लावून त्या बोटाने एका पांढ्र्या स्वच्छ कागदावर रेष मारुन दाखविली. ती रेष कार्यालयात उज

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

NISHIKANT SURENDRA RAMTEKE(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): NISHIKANT SURENDI

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.):

दाखल अधिकारी / अमलदा
ीस ठाणे, चंद्रपूर श.

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)